माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.४१९७/ २३ /अ.क्र.८८४७/२५**

**श्री.टि.के.रणदिवे**

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सेवा-६ (ड),**
सार्वजनिक बांधकाम विभाग, चौथा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (वि.चौ.)**
सार्वजनिक बांधकाम विभाग, चौथा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.१२.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २४.११.२०२२ | ०६.१२.२०२२ | २७.१२.२०२२ | -- |

प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी श्री.टि.के.रणदिवे उपस्थित नाहीत. विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालिन जन माहिती व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थींच्या मूळ जोडपत्र अ प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थींनी त्यांचा प्रथम अपिल अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे सादर केला किंवा कसे याविषयी निश्चित स्वरुपात कुठलीच माहिती उपलब्ध नसून अपिलार्थींनी त्यांचा द्वितीय अपिल अर्ज हा देखिल कोकण खंडपीठाकडे सादर केला असून सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या वतीने श्री.रणदिवे यांच्या दि.०६.०२.२०२३ रोजीच्या द्वितीय अपिल अर्जावर प्रतिसाद देखिल दिला असून अपिलार्थींनी त्यांचा मूळ प्रथम अपिल अर्ज सादर केला किंवा कसे याविषयी अभिलेखात कुठलीच नोंद नसल्याचे सुस्पष्टपणे नमूद करण्यात आले असून प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेवून त्या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यास प्रश्नच उद्भवत नाही असेही स्पष्टपणे नमूद करण्यात आले असून द्वितीय अपिल अर्ज प्राप्त प्रथम अपिल अर्जाच्या प्रतीवर संबंधित प्रथम अपिल अर्जाची सुनावणी देखिल आयोजित करण्यात आली असल्याचे मा.कोकण खंडपीठ यांनी कळविले

Jyotsna

आहे. तथापि, अपिलार्थी प्रथम अपिल अर्जाच्या सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. वरील अपिल अर्ज हा विहीत पध्दतीने मुख्यालयास हस्तांतरीत करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त पार्श्वभूमीवर जोडपत्र **अ** यातील मागितलेल्या १४ मुद्यांची माहिती यावर जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.०६.१२.२०२२ दिलेला प्रतिसादाचे अवलोकन केले असता उपरोक्त प्रतिसाद हा **कलम ८ (१) (त्र) मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या गिरीष रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग तसेच कॅनरा बँक विरुध्द सी.एच.श्याम या प्रकरणातील दिलेले निर्देश त्यानुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि.१७.१०.२०१४ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक व कायद्यातील कलम ८ (१) (त्र) या तरतूदीशी सुसंगत** असल्याचे प्रथम दर्शनी आढळून येते.

अपिलार्थींनी प्रथम अपिल अर्ज निश्चितपणे दाखल केला किंवा कसे या बाबत कुठलाही अभिलेख उपलब्ध नसल्याबाबत झालेला पत्रव्यवहार, दाखल केलेल्या जोडपत्र ब ची प्रत लक्षात घेता यात देखिल प्रथम दर्शनी तथ्य असल्याचे आढळून येत असून अपिलार्थींनी द्वितीय अपिल अर्ज मुख्यालयात दाखल करणे अपेक्षित असताना त्यांनी अनाकलनीयरित्या तो कोकण खंडपीठात देखिल दाखल केला असून तो प्रलंबित असताना अपिलीय अधिकाऱ्यांनी द्वितीय अपिल अर्जाबरोबर जोडलेल्या **जोडपत्र ब** बाबत सुनावणी देखिल आयोजित केली असता अपिलार्थींनी उपरोक्त सुनावणीस उपस्थित रहाण्याविषयी कुठलेही स्वारस्य दाखवलेले आढळून येत नाही.

आज झालेल्या सुनावणीस देखिल अपिलार्थी अनुपस्थित आहेत. ही बाब लक्षात घेता व जन माहिती अधिकारी स्तरावरच दिलेले उत्तर हे माहिती अधिकार अधिनियमाशी सुसंगत असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत दाखल केलेला द्वितीय अपिल अर्ज हा तथ्यहीन व गुणवत्ताहीन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०४-१२-२०२५**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra

Jyotsna